पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०८९ दि. २५ /०९ /२०१९**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन पुणे**

**सिंहगड रोड पोलीस स्टेशन या ठिकाणी कामानिमीत्त आलेल्या गृहस्थांना त्यांचे पडलेले पाकीट पोलीसांमुळे सुखरुप मिळाले परत.**

आज दि. २५/०९/२०१९ रोजी सकाळी इसम नामे सचिन नामदेव काळे वय ३५ वर्षे, रा. ग्रीनव्हॅली, ई विंग, नहे, पुणे हे त्यांचे मित्राचे पोलीस व्हेरीफीकेशन करण्याकरीता सिंहगडरोड पोलीस ठाणे, पुणे शहर या ठिकाणी आले होते. त्या ठिकाणी पोलीस ठाणेच्या बाहेर बसण्याकरीता ठेवण्यात आलेल्या बाकडयावर ते बसले असता त्यांचे पॅन्टचे मागील खिशातील पॉकीट त्या बाकडयावर पडले होते. मित्राचे पोलीस व्हेरीफीकेशन झालेनंतर इसम नामे सचिन नामदेव काळे हे सिंहगडरोड पोलीस ठाणे येथुन त्यांचे मित्रासोबत निघुन गेले. त्यांचे पाकीट तसेच बाकडयावर पडलेले होते. सदरचे पाकीट पोलीस शिपाई ६७४५ मयुर पतंगे यांनी बाकडयावर पाहुन, सदरचे पाकीट कोणाचे आहे याबाबत विचारणा केली परंतु सचिन काळे तेथुन निघुन गेले होते, त्यामुळे सदरचे पाकीट कोणाचे याबाबत काहीएक माहीती न मिळाल्याने पोलीस शिपाई मयुर पतंगे यांनी ते पोलीस ठाणे अमंलदार सहा.पोलीस निरीक्षक कणसे साहेब यांच्याकडे दिले. साधारणतः एक तासानंतर इसम नामे सचिन नामदेव काळे यांनी त्यांचे पॉकीट सापडले आहे का याबाबत पोलीस ठाणेस येवुन विचारणा केल्याने सहा.पोलीस निरीक्षक कणसे यांनी सदर पाकीट सचिन काळे यांचेच असल्याची खात्री करुन ते त्यांना सुखरुप परत दिल्याने इसम नामे सचिन नामदेव काळे यांनी पोलीस दलाचे आभार मानले असुन पोलीसांच्या कार्यपध्दतीबद्दल आनंद व्यक्त करुन धन्यवाद दिलेले आहेत.

